**महाराष्ट्र शासन**

**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय**

**"वनवर्धन" इमारत, पहिला मजला, मुख्य पोस्ट ऑफीस समोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर -416 003**

**कार्यालय** - 0231/2653632 E-mail ID -ccftkolhapur@mahaoforest.gov.in / ccftkolhapur@gmail.com


---

क्रमांक - कक्ष-4-3/आस्था/वनपाल/पदोन्नती/2026-27/1473 कोल्हापूर दिनांक 18 /08/2026

**आदेश**

**विषय :- वनपाल संवर्गातील रिक्त पदी वनरक्षक संवर्गातून तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणे बाबत.**

वनरक्षकांना वनपाल पदी पदोन्नती देण्यांचे अनुषंगाने दिनांक 12/11/2025 रोजी विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार निवडसुची तयार करणेत आली. त्यानुसार, पात्र ठरलेल्या खालीलप्रमाणे वनरक्षक यांना वनपाल संवर्गातील रिक्त पदांचे अधिन राहून सुधारीत वेतन मॅट्रीक्समधील **एस-9 :- 26400-83600** या वेतनश्रेणीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-10(2)/आस्था /एक/प्र.क्र.59(21-22)/1113, दिनांक 10/12/2025 अन्वये निर्देशित केलेनुसार महसूल व वनविभाग अधिसूचना दिनांक 14 ऑक्टोबर,2025 अन्वये वनपाल गट क या पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार रिक्त असलेल्या पदांमधील खुल्या प्रवर्गाची पदे ही तात्पुरत्या स्वरुपात जेष्ठतेनुसार पदोन्नतीने भरण्याची आहेत. तसेच, सदर पदोन्नती नियमित होईपर्यंत अशा पदोन्नत वनपालांना सेवा जेष्ठतेसाठी हक्क सांगता येणार नाही. सदरचे आदेश हे विविध न्यायालयीन निर्णयाचे अधिन राहून व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब दिनांक 7/5/2021 अन्वये निर्गमित करणेत येत आहे.

वरील नमुद शासन निर्णय व प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील सूचनाप्रमाणे खालील वनरक्षक यांना वनपाल पदावर तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नतीने पदस्थापना देणेत येत आहे.

| अ. क्र. | वनरक्षकांचे संपुर्ण नांव | मुळ प्रवर्ग | निवड प्रवर्ग | कार्यरत विभाग | पदोन्नती नंतरची पदस्थापना | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | श्री. संदिप विलास पाटील | मराठा | खुला | वन्यजीव विभाग | वनपाल (प्रादेशिक) निवडे, कोल्हापूर वन विभाग. | रिक्त पदावर |
| 02 | श्रीमती कल्पना शिवाजी पताडे | मराठा | खुला | कोल्हापूर वनविभाग | वनपाल (प्रादेशिक) गुरेघर सातारा वनविभाग | रिक्त पदावर |
| 03 | श्रीमती दिपाली श्रीकांत सागांवकर | चांभार/ अजा | खुला | वन्यजीव विभाग | वनपाल (प्रादेशिक) रोहोट सातारा वनविभाग | रिक्त पदावर |
| 04 | श्रीमती संजिवनी विजय भोसले | महार/ अजा | खुला | सातारा वन विभाग | वनपाल, पुनर्वसन, वन्यजीव विभाग कोयना | रिक्त पदावर |
| 05 | श्री. अशोक अजिनाथ ढाकणे | वंजारी/ भजड | खुला. | रत्नागिरी (चिपळुन) वन विभाग | वनपाल, कांदळवन दापोली | रिक्त पदावर |
| 06 | श्री. विष्णु शेशाप्पा नरळे | लोणारी/ इमाव | खुला | सामाजिक वनीकरण कोल्हापूर | वनपाल (प्रादेशिक)वाई, सातारा वन विभाग | रिक्त पदावर |
| 07 | श्री.स्वप्नील विलास काशिद | न्हावी/ इमाव | खुला | कोल्हापूर वन विभाग | वनपाल (प्रादेशिक) कुंभरोशी, सातारा वन विभाग | रिक्त पदावर |

सदरची तात्पुरती पदोन्नती ही खालील अटी व शर्तींचे अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे.

1) सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपात असल्याने परिस्थितीनुसार आवश्यक वाटल्यास पदोन्नतीचे आदेश रद्द बातल करण्यात येईल किंवा आवश्यकतेनुसार कनिष्ठतम कर्मचा-यास पदावनत करण्यात येईल.

मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक कोल्हापूर यांचे कार्यालय ★ कोल्हापूर ★

..2

2) ज्या कर्मचा-यास सदर आदेश प्राप्त होण्यापूर्वी विभागीय चौकशी सुरु करण्यात आली असल्यास, शिक्षेच्या अमलाखाली असल्यास अथवा संबंधितास निलंबनाखाली ठेवण्यात आले असेल तर सदर पदोन्नतीचा आदेश लागू होणार नाही. याबाबत कार्यालय प्रमुखाने खातरजमा करावी.

3) पदोन्नत वनपाल यांना सदर आदेश प्राप्त झालेचे दिनांकापासून 7 दिवसाचे आत पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू न झाल्यास संबंधितास पदोन्नतीची आवश्यकता नाही, असे गृहित धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

4) शासन निर्णयाप्रमाणे मत्ता व दायित्व विवरणपत्र दिल्याची खात्री करूनच पदोन्नतीचे पदावर रुजू होणेसाठी कार्यमुक्त करणेचे आहे.

5) मागासवर्गीय कर्मचा-यांच्या बाबतीत जातीच्या दाव्यासंबंधी भविष्यात वाद निर्माण झाल्यास संबंधीत कर्मचारी जबाबदार राहील व चौकशीत जर का संबंधीत कर्मचा-याचा जातीचा दावा खोटा असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधिताविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येवून त्यांना पदावनत करण्यात येईल.

6) **सदरचे आदेश हे शासन आदेश तसेच सर्वोच्च न्यायालय व महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई इत्यादी ठिकाणी या संबंधातील दावे/याचिका झाली असल्यास सदर प्रलंबित याचिकांच्या अंतिम निर्णयाच्या आदेशाचे अधिन राहील**.

7) **सदरचे आदेश हे महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई येथील** O.A.No.1110/2025 **बाबत अंतरिम आदेश झाला आहे तसेच अंतिम आदेशाच्या अधिन राहतील**.

8) संबंधित कर्मचारी पदोन्नतीने पदावर हजर झाले नाहीत अगर त्यांनी पदोन्नती नाकारली तर त्यांना शासन निर्णयानुसार देण्यात आलेल्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ काढुन घेण्यात येईल आणि या लाभापोटी दिलेल्या वेतनाची त्यांचेकडून वसूली करणेत येईल. तसेच, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-2015/प्र.क्र.303/का-12 दिनांक 12/9/2016 नुसार संबंधित नियंत्रण अधिकारी यांनी पुढील कार्यवाही करावी.

9) सामान्य प्रशासन विभाग, अधिसुचना क्रमांक-एसआरव्ही-2017/प्र.क्र.466/कार्या-12/ दि.28/5/2018 व प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कडील पत्र क्रं-कक्ष-10(2)/एक/MSCIT/प्र.क्र.121(18-19)/ 2180दि.18.12.18 अन्वये सदर वनरक्षक यांनी संगणक हाताळणी व वापराबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त केले आहे काय याची खात्री केले नंतरच त्यांना पदोन्नतीचे पदावर रुजू होणेसाठी कार्यमुक्त करावे.

10) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक-एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन 12 दि.1.8.19 मधील तरतूदीनुसार संबंधीत वनरक्षक यांना मूळ नियुक्तीचे पदावर स्थायित्व प्रमाणपत्र दिले आहे, वयाची 50/55 नंतर पुनर्विलोकन होऊन पात्र झालेले आहेत. तसेच हिंदी / मराठी भाषा उत्तीर्ण / सुट दिलेली असलेची खात्री करून आदेश लागू करावेत.

वरील वनरक्षकांना त्यांचे पदोन्नतीचे ठिकाणी रुजू होणेसाठी स्थानिक व्यवस्था करुन **तात्काळ** कार्यमुक्त करावे. तसेच, उपरोक्त कर्मचा-यांना प्रचलित नियमांचे अधिन राहून त्यांचे विभागात रिक्त पदाचे अनुषंगाने पदोन्नतीचे पदावर रुजु करून घ्यावे.संबंधित कर्मचारी पदोन्नतीने पदावर हजर झाले नाहीत अगर त्यांनी पदोन्नती नाकारली तर त्यांना शासन निर्णयानुसार देण्यात आलेल्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ काढुन घेण्यात येईल.याची संपूर्ण जबाबदारी संबंधित आस्थापना अधिकारी यांची राहील, याची नोंद घ्यावी.

मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक कोल्हापूर यांचे कार्यालय
सत्यमेव जयते
कोल्हापूर

**(श्रीलक्ष्मी.ए) भावसे**
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)**
**कोल्हापूर**

**प्रति,**
वरीलप्रमाणे वनरक्षक यांना त्यांचे नियंत्रण अधिकारी यांचेमार्फत

**प्रतिलिपी** : माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.

1. उपवनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सहयाद्री व्याघ्र राखीव, कोल्हापूर
2. उपवनसंरक्षक, कोल्हापूर, सातारा, / विभागीय वन अधिकारी, रत्नागिरी (चिपळूण)
3. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर
4. विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग,दक्षिण कोकण.

प्रत :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर